महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र.मासं/रवका/न.क्र.३४८/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१,धारावी रोड,माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ४५३ दिनांक ०१ / ०४ / २०१३

विषय : शासन व्यवहारात मराठीचा वापर करणेबाबत
शासन निर्णय, परिपत्रके, अधिसूचना, पत्रव्यवहार,सकेतस्थळे इत्यादीमध्ये मराठीचा वापर.

संदर्भ : १) शासन परिपत्रक क्र.मभावा-१०१३/५७/८२/प्र.क्र.९/२०१३/भाषा-२, दि.२९ जानेवारी २०१३
२) प्रशासकीय परिपत्रक क्र. ३२८, दि. २५.०१.२०११.

.....

प्रशासकीय दैनंदिन कामकाज अपरिहार्यता वगळता एरवी मराठी भाषेतुनच करण्याचे महाराष्ट्र शासनाचे प्रशासकीय धोरण महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीनेही अवलंबिले आहे. आतापर्यंत विविध प्रशासकीय परिपत्रकान्वये वेळोवेळी मराठी भाषेच्या वापराविषयी सूचना जारी केल्या आहेत.

२. या संदर्भात वर्जित प्रयोजने वगळता इतर बाबतीत संयुक्तिक कारणे नसताना राजभाषा मराठीचा वापर करण्यास जे अधिकारी/कर्मचारी टाळाटाळ करतात अशा अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या गोपनीय अहवालात नोंद घेण्याबाबत तसेच वारंवार समज देऊनही जे अधिकारी/कर्मचारी राजभाषेचा वापर करण्याच्या नियमांचे पालन करणार नाहीत त्यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्याबाबतच्या शासनाकडून देण्यात आलेल्या सूचना वेळोवेळी प्रशासकीय परिपत्रकान्वये निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

३. आता कक्ष अधिकारी, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या क्र.संकीर्ण-२०१३/प्र.क्र.५२/प्रशा-२, दिनांक ०४.०३.२०१३ च्या पत्रासोबत प्राप्त झालेल्या शासन परिपत्रक क्र. मभावा-१०१३/५७/८२/प्र.क्र.९/ २०१३/भाषा-२, दिनांक २९ जानेवारी २०१३ अन्वये मराठीचा वापर करण्यास टाळाटाळ करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांचे विरुध्द शिस्तभंग कारवाई करण्याबाबत सूचित करण्यात आलेले आहे. सोबत कक्ष अधिकारी, ऊद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांच्या दिनांक ०४.०३.२०१३ च्या पत्राची प्रत व संदर्भिय शासन परिपत्रकाची प्रत जोडण्यात येत आहे.

४. सर्व संबंधितांना विनंती करण्यात येते की, सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२९.०१.२०१३ च्या शासन परिपत्रकातील सूचनांचे अवलोकन करुन त्यातील आदेशांचे काटेकोरपणे पालन करावे.

५. सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या इंट्रानेटवर उपलब्ध करण्यात आले आहे.

सोबत : वरीलप्रमाणे

(संदेश हाके)
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

*D:\O&M\Adm Cir.F.N.348-Marathi Bhasha.doc*
*25/03/2013*

**महाराष्ट्र शासन**

दूरध्वनी क्र.: २२७९३७२१, २२८१०३९४
फॅक्स क्र. : २२८२४४४६, २२०४५९६९.
ईमेल आयडी: ielddo_adm2@maharashtra.gov.in
ield_ad.2@rediffmail.com

क्र.संकीर्ण-२०१३/प्र.क्र.५२/प्रशा-२,
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ०४ मार्च, २०१३

प्रति,

१. सचिव (लघु व मध्यम उद्योग) तथा पदसिध्द विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर,मुंबई.
२. संचालक,शासकीय मुद्रण व लेखन सामग्री,चर्नीरोड स्टेशन जवळ, नेताजी सुभाष मार्ग,मुंबई-४
३. संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, जुने सचिवालय, सिव्हील लाईन, पोस्ट बॉक्स नं.१११, नागपूर- ४४०००१.
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, उद्योग सारथी, महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०००९३.
५. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ, युनायटेड इंडिया इमारत, पहिला माळा, सर फिरोजशहा मेहता रोड, फोर्ट, मुंबई -४००००१.
६. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पेट्रोकेमिकल्स महामंडळ मर्यादित,२१४ न्यु मरीन चेंबर्स, एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठासमोर, ४३, न्यु मरीन लाईन्स, मुंबई -४०००२०.
७. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, १९/२१, मनोहरदास स्ट्रीट, फोर्ट, मुंबई-४००००१.
८. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ, कृपानिधी, ९, वालचंद हिराचंद मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई-४००००१.
९. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ, प्लॉट नं.७, अजनी चौक, वर्धा रोड, नागपूर-४४००१५.
१०. व्यवस्थापकीय संचालक, कोकण विकास महामंडळ मर्यादित, युनिट क्र.१६, आरे दुग्ध वसाहत, गोरेगांव (पूर्व), मुंबई-४०००६५.
११. व्यवस्थापकीय संचालक, पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ मर्यादित, दुसरा मजला, कुबेरा चेंबर्स, डॉ.राजेद्र प्रसाद पथ, संचेती हॉस्पीटल समोर, शिवाजीनगर, पुणे -५.
१२. व्यवस्थापकीय संचालक, मराठवाडा महाराष्ट्र विकास महामंडळ मर्यादित, विकास भवन, डॉ.राजेंद्र प्रसाद मार्ग, औरंगाबाद-४३१००१.
१३. व्यवस्थापकीय संचालक, विदर्भ महाराष्ट्र विकास महामंडळ मर्यादित, महाजन बिल्डिंग, मेन रोड, सिताबर्डी, नागपूर-४४००१२.
१४. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिकी महामंडळ मर्यादित, प्लॉट नं. एएम-३, एमआयडीसी., क्रॉस रोड-ए, मरोल इंडस्ट्रीयल एरिया, अंधेरी (पू), मुंबई- ४०० ०९३.
१५. व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य विद्युत सूत्रधारी कं.लि., हॉंगकॉंग बिल्डिंग, ४था मजला एम.जी.रोड, फोर्ट, मुंबई-२३.
१६. व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मीती कं.लि.प्रकाशगड,वांद्रे(पू),मुंबई-५१.
१७. व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कं.लि.प्रकाशगड,वांद्रे(पू),मुंबई-५१.
१८. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.लि.प्रकाशगड,१ला मजला, प्लॉट नं.सी-१९, ई-ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पू),मुंबई-५१.

प्रति,

मा. राज्यपाल यांचे सचिव
मा. मुख्यमंत्री यांचे सचिव

१९. महासंचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण, म्हाडा कमर्शियल कॉम्प्लेक्स, स.न.१९१-ए, फेज-८ त्रिदलनगर समोर, येरवडा, पुणे -४११००६.

२०. सचिव, महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग, वर्ल्ड ट्रेड सेंटर, सेंटर नं.१, १३ वा मजला, कुलाबा,मुंबई-४०० ००५.

२१. मुख्य अभियंता (विद्युत), बांधकाम भवन, तिसरा मजला, सा.बां.विभाग, मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई-१.

२२. कामगार आयुक्त,कामगार भवन,भूखंड क्र.सी-२०, ब्लॉक-इ, बांद्रा-कुर्ला संकुल, बांद्रा (पूर्व),मुंबई-५१,

२३. संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, कामगार भवन, ५ वा मजला, ब्लॉक-ई, भूखंड क्र.सी-२०, बांद्रा-कुर्ला संकुल, बांद्रा (पूर्व), मुंबई-४०००५१,

२४. संचालक, बाष्पके, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय, कामगार भवन, सातवा मजला, भूखंड क्र.सी-२०, ब्लॉक-इ, बांद्रा-कुर्ला संकुल, बांद्रा (पूर्व), मुंबई-४०००५१,

२५. प्रबंधक, औद्योगिक न्यायालय,प्रशासकीय इमारत, पहिला मजला, वांद्रे (पूर्व),मुंबई-५१.

२६. संचालक, कै. नारायण मेघाजी लोखंडे महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था, दादाभाई चमारबागवाला मार्ग, परेल, मुंबई- ४०० ०१२.

२७. कल्याण आयुक्त, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ , हुतात्मा बाबु गेनू, मुंबई गिरणी कामगार क्रिडा भवन, सेनापती बापट मार्ग, एलफिन्स्टन, मुंबई-४०००१३.

**विषयः- शासन व्यवहारात मराठीचा वापर**
**शासन निर्णय, परिपत्रके, अधिसूचना, पत्रव्यवहार,**
**संकेतस्थळे इत्यादी मध्ये मराठीचा वापर**

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत मराठी भाषा विभाग यांचे परिपत्रक क्र.मभावा-१०१३/५७/८२//प्र.क्र.९/२०१३/भाषा-२, दिनांक २९ जानेवारी, २०१३ माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे.

२. सदर परिपत्रकात नमुद केलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे तसेच आपल्या अधिपत्याखालील क्षेत्रीय कार्यालयास शासकीय कामकाजामध्ये मराठीचा वापर करण्याबाबत अवगत करण्यात यावे, ही विनंती.

आपला,

( कृ. जो. मेंगाणे )
कक्ष अधिकारी.

सहपत्रः- वरीलप्रमाणे.

प्रत, माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी,

सर्व उप सचिव / अवर सचिव / कक्ष अधिकारी,उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,मंत्रालय, मुंबई .

**शासन व्यवहारात मराठीचा वापर**

**शासन निर्णय, परिपत्रके, अधिसूचना, पत्रव्यवहार, संकेतस्थळे इत्यादी मध्ये मराठीचा वापर.....**

**महाराष्ट्र शासन**

शासन परिपत्रक क्रमांक — मभावा-१०१३/५७/८२/प्र.क्र.९/२०१३/भाषा-२

मराठी भाषा विभाग,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई — ४०० ०३२.

दिनांक - २९ जानेवारी, २०१३.

वाचा :- १) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. मभावा-१०८०/प्र.क्र.५४/२०, दि.१८.०५.१९८२

२) सा. प्र. वि. शासन निर्णय क्र. मभावा-१०८६/४३२/प्र.क्र.१६१/८६/वीस-ब, दि. १८ जुलै, १९८६.

३) सा.प्र.वि. शासन परिपत्रक क्र. मभावा-२०१०/प्र.क्र.७५/२०-ब, दिनांक १४.०७.२०१०

४) मराठी भाषा विभाग शासन परिपत्रक क्र. मभावा-१०११/प्र.क्र.७८/२०११/भाषा-२, दि.१० मे, २०१२.

**परिपत्रक**

महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ मधील तरतुदीनुसार वर्जित प्रयोजने वगळता सर्व कामकाज मराठीतून करणे बंधनकारक करण्यात आले आहे. शासकीय कार्यालयाप्रमाणेच शासनाच्या अंगीकृत व्यवसायांनी देखील वर्जित प्रयोजने वगळता सर्व कामकाज मराठीतून करण्याबाबत वेळावेळी सूचना देण्यात आलेल्या आहेत. वर्जित प्रयोजने वगळता इतर बाबतीत संयुक्तिक कारण नसताना राजभाषा मराठीचा वापर करण्यास टाळाटाळ करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांच्या गोपनीय अहवालात नोंद घेण्याबाबत तसेच वारंवार समज देऊनही जे अधिकारी व कर्मचारी राजभाषेचा वापर करण्याच्या नियमांचे पालन करणार नाहीत त्यांच्याविरुद्ध शिस्तभंगाची कार्यवाही करण्याच्या सूचना सर्व कार्यालय प्रमुख व विभाग प्रमुख यांना संदर्भाधीन आदेशान्वये देण्यात आल्या आहेत.

अद्यापही मंत्रालयातून निर्गमित होणारे शासन निर्णय, परिपत्रके अधिसूचना, संकेतस्थळे, पत्रव्यवहार, पत्रव्यवहारातील स्वाक्षरी इत्यादी इंग्रजीमध्ये दिसून येतात अशा तक्रारी सातत्याने प्राप्त होत आहेत. शासन व्यवहारात वर्जित प्रयोजने वगळता इतर बाबतीत महत्वाचे संयुक्तीक कारण नसताना मराठीचा वापर करण्यात यावा याबाबत सर्व कार्यालय प्रमुख व विभाग प्रमुख यांना पुन्हा सूचना देण्यात येत आहेत. सदर सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. तसेच सदर सूचना आपल्या विभागाच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयांना व त्यांच्या कार्यालयप्रमुखांना देण्यात याव्यात.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर संकेतांक क्रमांक २०१३०१२९१४२७४३१६३३ याखाली उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

आपली,

(ललिता शि. देठे)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा. राज्यपाल यांचे सचिव

मा. मुख्यमंत्री यांचे सचिव

मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव
मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मा. मुख्यसचिव/ अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव सर्व मंत्रालयीन विभाग
सर्व विभागीय आयुक्त
मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख
सर्व जिल्हाधिकारी
सर्व जिल्हापरिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
प्रबंधक उच्च न्यायालय, मुळ शाखा, मुंबई (पत्राने)
प्रबंधक उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई (पत्राने)
सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ, विधानभवन, मुंबई
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने)
महालेखापाल — १ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई
महालेखापाल — (लेखा परीक्षा), मुंबई
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
भाषा संचालक, भाषा संचालनालय, वांद्रे (पूर्व), मुंबई
सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई
सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई
संचालक, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई
सर्व विभागीय सहायक भाषा संचालक, पुणे / नागपूर / औरंगाबाद / नवी मुंबई
निवड नस्ती (दोन प्रती)

-----------

R-10013

का.सं. / मा.सं 342
दिनांक 18/3/13

क्रमांक- संकीर्ण-०६१३/प्र.क्र.८/प्रशा-४
उदयोग, ऊर्जा व कामगार विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक- ७, मार्च, २०१३

प्रति,

विकास आयुक्त,उद्योग संचालनालय,मुंबई.
संचालक, शासकीय मुद्रण ,लेखन सामग्री प्रकाशन संचालनालय,मुंबई.
कामगार आयुक्त,मुंबई.
कल्याण आयुक्त, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, मुंबई.
संचालक,औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, ताडदेव, मुंबई.
संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई.
संचालक, श्रम विज्ञान संस्था, मुंबई.
प्रबंधक,औद्योगिक न्यायालये, मुंबई.
मुख्य कार्यकारी अधिकारी,महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ,मुंबई.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य लघु उद्योग महामंडळ, मुंबई.
मुख्य कार्यकारी अधिकारी,महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामाद्योग मंडळ, मुंबई
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य उर्जा नियामक आयोग, मुंबई.
संचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण, पूणे.
संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी, मुंबई
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पारेषण कंपनी,मुंबई
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वितरण कंपनी,मुंबई

विषय:- शासन व्यवहारात मराठीचा वापर.

महोदय,

महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ मधील तरतूदींनुसार वर्जित प्रयोजने वगळता सर्व कामकाज मराठीतून करणे बंधनकारक करण्यात आहे.शासनाच्या कार्यालयांप्रमाणेच शासनाच्या अंगीकृत व्यावसायांनी देखील वर्जित प्रयोजने वगळता सर्व कामकाज मराठीतून करण्याबाबत वेळोवेळी सूचना देण्यात आलेल्या आहेत.तरी आपल्या शासन व्यवहारात वर्जित प्रयोजने वगळता इतर बाबतीत मराठीचा वापर करण्यात यावा.ही विनंती.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(संजू क. गुप्ते)
कक्ष अधिकारी